सार्वजनिक वितरण व्यवस्थेअंतर्गत केरोसिनचे वितरण PoS (Point of Sale device) द्वारे करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन

अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग

शासन निर्णय क्रमांकः रॉकेल-२०१८ /प्र.क्र.१४१ / ना.पु.२७,

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय विस्तार, मुंबई- ४०० ०३२
दिनांक: २९ मे, २०१८.

प्रस्तावना:-

राज्यात सार्वजनिक वितरण व्यवस्थेत पारदर्शकता यावी व अनुदानित दराचे अन्नधान्य पात्र लाभार्थ्यांपर्यंत पोहोचावे यास्तव राष्ट्रीय अन्नसुरक्षा अधिनियम (NFSA),२०१३ अंतर्गत रास्तभाव दुकानातून अन्नधान्याचे वितरण लाभार्थ्याची बायोमेट्रीक ओळख पटवून करण्यात येत असून त्याकरीता PoS (Point of Sale device) चा वापर करण्यात येत आहे. सदर निर्णयामुळे अन्नधान्य वितरणात पारदर्शकता आलेली असून काळ्याबाजारास आळा बसलेला आहे.सबब अन्नधान्य वितरणाच्या धर्तीवर केरोसिन वितरणात पारदर्शकता यावी यास्तव केरोसिनचे वितरणही PoS (Point of Sale device) द्वारे करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय: -

सार्वजनिक वितरण व्यवस्थेअंतर्गत केरोसिन वितरणात पारदर्शकता यावी व केरोसिन पात्र लाभार्थ्यांपर्यंत पोहोचावे यास्तव केरोसिनचे वितरण PoS (Point of Sale device) द्वारे करण्याबाबतचा निर्णय शासनाने घेतलेला आहे. मुंबई ठाणे शिधावाटप क्षेत्रातील सर्व रास्तभाव दुकानांमध्ये यापुर्वीच PoS (Point of Sale device) बसविण्यात आले असून आता त्यामध्ये केरोसिन विक्री सुविधा उपलब्ध करून देण्यात आलेली आहे. त्यानुसार दि.१ जून,२०१८ पासून प्रायोगिक तत्वावर मुंबई-ठाणे शिधावाटप क्षेत्रात रास्तभाव दुकानातून केरोसिनचे वितरण PoS (Point of Sale device) द्वारेच करण्यात यावे.

२. यासंदर्भात पुर्वतयारी करण्याबाबतच्या सूचना नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई यांना यापुर्वीच देण्यात आलेल्या आहेत. यासंदर्भात PoS Device द्वारे धान्य वितरणाबाबत दि.१२ एप्रिल, २०१८ च्या अर्धशासकिय पत्रान्वये देण्यात आलेल्या निर्देशांचे पालन केरोसिन वितरणाबाबतही करण्यात यावे. तसेच केरोसिन वितरण करतांना शिधापत्रिकाधारकाकडे

गॅस जोडणी नसल्याबाबतची खात्री करूनच केरोसिन वितरण करण्यात यावे.तसेच अनुदानित दराच्या केरोसिनपासून कोणताही पात्र लाभार्थी वंचित राहणार नाही, याबाबत दक्षता घेण्यात यावी.

३. सदर प्रायोगिक तत्वावरील केरोसिन वितरणाच्या अंमलबजावणीसंदर्भातील सविस्तर मार्गदर्शक सूचना यानंतर निर्गमित करण्यात येतील.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०५२९१३०८१२०००६ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Uddhav Dattatraya Walunj

Digitally signed by Uddhav Dattatraya Walunj
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Food,civil Supplies and Consumer Protection Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=3e52cab4406cc0eafdac51ee7f716de23ff575342e86fcb658bbfd2de90eba24, cn=Uddhav Dattatraya Walunj
Date: 2018.05.29 13:11:00 +05'30'

(उ.द.वाळुंज)
सह सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा.विरोधी पक्षनेता, महाराष्ट्र विधानसभा, मुंबई.
२. मा. विरोधी पक्षनेता, महाराष्ट्र विधानपरिषद, मुंबई.
३. सर्व सन्माननिय विधानसभा सदस्य, महाराष्ट्र विधानसभा.
४. सर्व सन्माननिय विधानपरिषद सदस्य, महाराष्ट्र विधानपरिषद.
५. नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई.
६. सर्व उप आयुक्त (पुरवठा).
७. सर्व जिल्हा पुरवठा अधिकारी.
८. सर्व अन्न धान्य वितरण अधिकारी.
९. सर्व उप नियंत्रक शिधावाटप,मुंबई.
१०. मा.मंत्री, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण यांचे खाजगी सचिव.
११. मा.राज्यमंत्री, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण यांचे खाजगी सचिव.
१२. निवडनस्ती.